पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला देणे असलेली जलदेयकाची थकबाकी ही पुस्तकी समायोजनाद्वारे प्रदान करण्यास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. देयक-०११८/प्र.क्र.१६/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.

दिनांक १५ फेब्रुवारी २०१९.

वाचा :-
१) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. २०६/ पोआ/ कक्ष-१४/ अर्थसं/ अयो/ टे-५/ १७, दिनांक २१.१२.२०१७.
२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. ०५/ पोआ/ कक्ष-१४/ अर्थसं/ अयो/ टे-५/ १८, दिनांक १०.०१.२०१८.
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. ७७/ पोआ/ कक्ष-१४/ अर्थसं/ अयो/ टे-५/ १८, दिनांक ३१.०५.२०१८.
४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. २२४/ पोआ/ कक्ष-१४/ अर्थसं/ अयो/ टे-५/ १८, दिनांक १२.१२.२०१८.

प्रस्तावना.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील कार्यालयांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा करण्यात येतो. अशा १४ कार्यालयांमधील जल जोडण्यांच्या देयकांच्या मूळ आकाराची मार्च-२०१७ पर्यंत थकबाकी ₹ १५,९४,२७,९४५/- इतकी आहे.

२. तसेच, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला अतिक्रमण विरोधी कारवाईसाठी, त्या प्रयोजनासाठी मंजूर पदांव्यतिरिक्त, वेळोवळी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येतो. ऑक्टोबर-२००९ ते जानेवारी-२०१६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेला पुरवण्यात आलेल्या अतिरिक्त पोलीस बंदोबस्ताचा खर्च म्हणून ₹ १५,९४,५६,१७१/- इतकी रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनास (पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई) येणे आहे.

३. उक्त जलदेयकाची थकबाकी ही ऑक्टोबर-२००९ ते जानेवारी-२०१६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेला पुरवण्यात आलेल्या अतिरिक्त पोलीस बंदोबस्ताच्या खर्चाच्या थकबाकीच्या नावे पुस्तकी समायोजित करुन प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाने सादर केला आहे. उक्त प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला अतिक्रमण विरोधी कारवाईसाठी, त्या प्रयोजनासाठी मंजूर पदांव्यतिरिक्त, ऑक्टोबर-२००९ ते जानेवारी-२०१६ या कालावधीत पुरवण्यात आलेल्या अतिरिक्त पोलीस बंदोबस्ताच्या खर्चाची थकबाकी ₹ १५,९४,५६,१७१/- *(रुपये पंधरा कोटी, चौऱ्याण्णव लक्ष, छपन्न हजार एकशे एक्काहत्तर फक्त)* यामधून पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील १४ कार्यालयांमधील जल जोडण्यांच्या देयकांच्या मूळ आकाराची मार्च-२०१७ पर्यंत थकबाकी ₹ १५,९४,२७,९४५/- *(रुपये पंधरा कोटी, चौऱ्याण्णव लक्ष, सत्तावीस हजार नऊशे पंचेचाळीस फक्त)* पुस्तकी समायोजनाद्वारे प्रदान करण्यास, याद्वारे, मंजुरी देण्यात येत आहे.

२. उक्त खर्च हा पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या तपशीलवार लेखाशीर्षाखाली स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे भागविण्यात यावा:-

अ.क्र. *(१)*	लेखाशीर्ष *(२)*	रक्कम *(३)*
१	गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत) (अनिवार्य) (२०५५००९७), ०६-दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क.	₹ १५,७९,८४,८४२/-
२	गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०५) रुग्णालयीन खर्च, (०५)(०१) बृहन्मुंबईतील पोलीस रुग्णालये (अनिवार्य) (२०५५०१४१), ०६-दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क.	₹ ९,७२,७९८/-
३	गृह विभाग-मागणी क्र. बी-१, २०५५, पोलीस, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०६) पोलीस शवपरीक्षा केंद्र, (०६)(०१) बृहन्मुंबईतील पोलीस शवपरीक्षा केंद्र (अनिवार्य) (२०५५०३९१), ०६-दूरध्वनी, वीज व पाणी शुल्क.	₹ ४,७०,३०५/-
एकूण-		₹ **१५,९४,२७,९४५/-**

३. अतिक्रमण विरोधी कारवाईसाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्याकडून पुरवण्यात आलेल्या अतिरिक्त पोलीस बंदोबस्ताचा खर्च म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनास येणे असलेल्या एकूण रकमेपैकी ₹ १५,९४,२७,९४५/- *(रुपये पंधरा कोटी चौऱ्याण्णव लक्ष सत्तावीस हजार नऊशे पंचेचाळीस फक्त)* इतकी रक्कम ही "००५५-पोलीस, महसुली

जमा, १०२ (०१) इतर पक्षांना पुरविलेले पोलीस, (०१)(०१) इतर पक्षांना पुरविलेले पोलीस (००५५ ००२१)" या तपशीलवार महसुली लेखाशीर्षाखाली जमा दर्शविण्यात यावी.

४. बृहन्मुंबई महानगरपालिकेने उक्त ₹ १५,९४,२७,९४५/- *(रुपये पंधरा कोटी चौऱ्याण्णव लक्ष सत्तावीस हजार नऊशे पंचेचाळीस फक्त)* इतक्या रकमेचे उपयोजन प्रमाणपत्र *(Utilization Certificate)* शासनास (गृह विभाग) सादर करावे.

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाशी विचारविनिमय करुन *(अनौपचारिक संदर्भ क्र.५/२०१९/व्यय-७, दिनांक ०७.०१.२०१९)*, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, *भाग-पहिला, उप विभाग-एक, अनुक्रमांक-६, महाराष्ट्र वित्तीय नियम, १९५९* यामधील नियम ४० अन्वये प्रशासनिक विभाग या नात्याने गृह विभागास प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०२२८१७३०५९३९२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.02.28 17:34:47 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्य मंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.
६) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
७) सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) जल अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
९) उप आयुक्त (अतिक्रमण निर्मूलन), बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

प्रत-

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
३) कार्यासन अधिकारी (अर्थसं.-१/ अर्थसं.-२/ विशा.-४), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) निवड फाईल, पोल-७.